NOTIFICATION

Home Department,
Mantralaya, Mumbai-400 032
Datd the 24th September, 2003.

Motor Vehicles Act, 1988

No.MCT-1002/1642/CR-249/TRA-5.- Whereas it has been decided to constitute Motor Accidents Claims Tribunals within the State consisting of a single Member, equivalent to Addtionai District Judge and Additional Sessions Judge posted at Kelapur Taluka, Yavatmal District having territorial jurisdiction over the area comprised within the limits of Yavatmal District.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub section (1) of section 165 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), the Government of Maharashtra, hereby,-

(a) constitutes a Motor Accidents Claims Tribunal for the area comprised within the limits of Yavatmal District, for the purpose of adjudicating upon claims for compensation, in respect of accidents involving the death of, or bodily injury to persons, arising out of the use of motor vehicles, or damages to any property of a thitd party so arising, or both, and

(b) directs that the Motor Accidents Claims Tribunal so constituted for the Kelapur Taluka, Yavatmal District shall consist of a single member; and

(c) appoints the Additional District and Additional Sessions Judge of the Yavatmal District as an ex-officio member of the said Tribunal.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

P.K. Sagdeo
Deputy Secretary to Government.

E:Tra-5 Adhisuohna.lwp

अधिसूचना

गृह विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २४ सप्टेंबर,२००३

मोटार वाहन अधिनियम १९८८

क्रमांक : एमसीटी १००२/१६४२/प्र.क्र.२४९/परि-५ - त्याअर्थी, यवतमाळ जिल्हयाच्या हददीत समाविष्ट असलेल्या क्षेत्रावर प्रादेशिक अधिकारिता असलेल्या यवतमाळ जिल्हयातील केळापूर तालुक्यातील पदस्थापित अपर जिल्हा न्यायाधीश आणि अपर सत्र न्यायाधीश यांच्याशी समतुल्य असलेले एक सदस्याचे बनलेले मोटार अपघात दावे न्यायाधिकरण, राज्यांतर्गत घटित करण्याचे ठरविले आहे ;

त्याअर्थी, आता ; मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम १६५ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे :-

क) मोटार वाहनांच्या वापरामुळे झालेला व्यक्तींचा मृत्यू किंवा त्यांना झालेली शारीरिक इजा किंवा त्यामुळे झालेले त्रयस्थ पक्षाचे नुकसान किंवा दोन्हींही यांचा अंतर्भाव असणा-या अपघाताच्या संबंधातील नुकसान भरपाईसाठीच्या दाव्यांवर अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनासाठी, यवतमाळ जिल्हयाच्या हददीत समाविष्ट असलेल्या क्षेत्रासाठी मोटार अपघात दावे न्यायाधिकरण घटित करीत आहे ; आणि

ख) असा निदेश देत आहे की, तालुका केळापूर, जिल्हा यवतमाळ यासाठी असे घटित करण्यात आलेले मोटार अपघात दावे न्यायाधिकरण हे एका सदस्याचे बनलेले असेल, आणि

ग) उक्त न्यायाधिकरणाचा पदसिध्द सदस्य म्हणून यवतमाळ जिल्हयाच्या अपर जिल्हा व अप्पर सत्र न्यायाधीशाची नेमणूक करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्र. कृ . सगदेव
शासनाचे उपसचिव